| MHSO110001722026 | **फौजदारी किरकोळ अर्ज क्र. १७/२०२६**<br>नारायण शेंडगे वि. सरकार<br>**निशाणी क्र.१ खालील आदेश** |
|---|---|

अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज, भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ५०३ नुसार, वेळापूर पोलीस ठाणे ता. माळशिरस यांनी गुन्हा नोंद क्र. ४१६/२०२५ मध्ये भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ११८(१), ११९(१), ३०८(४)(५), ३५१(२)(३), ३५२, ११५(२), ३(५) गुन्हयात जप्त केलेली हिरो कंपनीची एच.एफ. डिलक्स मोटर सायकल गाडी जिचा नोंदणी क्र. एम.एच. ४५, एसी. ७८९६, चेसीस क्र. MBLHAR203H9G01530, इंजिन क्र. HA11ENH9G21479 ही त्याच्या ताब्यात मिळण्याकरिता दाखल केलेला आहे.

**०२.** अर्जावर तपासी अधिकारी यांनी म्हणणे देवून कथन केले की, अर्जदाराने गुन्हयाच्या तपासात मोटारसायकल मालकी हक्काबाबत कोणतेही दस्तऐवज सादर केले नाहीत. प्रस्तुत गुन्ह्यात कलम वाढ केले असून अर्जदार यांनी मागणी केलेली मोटार सायकल वाढीव कलमाबाबत तपास पूर्ण होईपर्यंत ताब्यात देण्यात येवू नये अशी विनंती केली आहे.

**०३.** सरकारी अभियोक्ता यांनी म्हणणे देवून कथन केले की, जप्त मुद्देमाल हा गुन्हयातील महत्वाचा पुरावा असून तो गुन्हयाशी थेट संबंधीत आहे. अर्जदाराच्या ताब्यात वाहन दिल्यास तो त्यामध्ये बदल, त्याची विक्री अथवा ते गहाण ठेवेल. त्यामुळे सदर वाहन अर्जदाराच्या ताब्यात देवू नये, अशी विनंती त्यांनी केली आहे.

**०४.** अर्जदाराने त्याच्या अर्जाच्या पुष्ठर्थ नि. क्र. ०३ सोबत वेळापूर पोलीस ठाणे यांनी गु. रं. नं. ४१६/२०२५ ची छायांकित प्रत, जप्त वाहनाची आर. सी. बुकची प्रमाणित प्रत व अर्जदाराचे आधारकार्डाची छायांकित प्रत आणि जप्त वाहनाचे विम्याची पावतीची छायांकित प्रत अभिलेखावर दाखल केलेल्या आहेत.

**०५.** अर्जदाराकरिता विद्वान विधीज्ञ व्ही. बी. भिलारे व अभियोग पक्षाकरिता विद्वान विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. व्ही बी सोनटक्के यांचा युक्तीवाद श्रवण केला.

**०६.** अर्जदार हा वरील नमूद वर्णनाच्या वाहनाचा मालक व ताबेदार असल्याचे त्याचे कथन आहे. अभिलेखावर दाखल असलेल्या जप्त वाहनाचे नोंदणी प्रमाणपत्र अर्जदार हा जप्त वाहनाचा कायदेशिर मालक व ताबेदार असल्याचे दिसून येते. तसेच, अर्जदार हा सदर वाहनाचा

घरगुती वापरासाठी वापरत असल्याचे दिसून येते.

**०७.** अर्जदाराच्या कथनानुसार सदरचे वाहन पोलीस ठाण्याच्या आवारामध्ये एका ठिकाणी उभे आहे. त्यामुळे, जप्त वाहन जर एका ठिकाणी बंद अवस्थेत उभे राहिले तर, वातावरणामध्ये होणा–या बदलामुळे त्याची बॉडी, टायर, टयुब, इंजिन व इतर भाग निकामी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याचबरोबर, जप्त वाहन हे यांत्रीक स्वरुपातील असल्यामुळे ते निरर्थकपणे एकाच ठिकाणी पडून राहिले तर, ते निरुपयोगी होईल. विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता व तपासी अंमलदार यांनी जप्त वाहन अर्जदाराच्या ताब्यात देण्यास हरकत घेतली आहे. ज्याअर्थी, अर्जदार हा जप्त वाहनाचा मालक व ताबेदार आहे, त्याअर्थी अर्जदार सदर वाहनाचा अंतरिम ताबा मिळण्यास पात्र आहे. म्हणून, मी खालील प्रमाणे आदेश पारीत करतो.

## आदेश

**०१.** अर्ज मंजूर करण्यात येतो.

**०२.** पोलीस निरीक्षक/ तपासीक अधिकारी, वेळापूर पोलीस ठाणे, ता. माळशिरस जि. सोलापूर यांना निर्देश देण्यात येतो की, अर्जदाराकडून रक्कम रुपये १,००,०००/–

(अक्षरी एक लाख रुपये फक्त) चा सुपुर्तनामा भरुन घेऊन, गुन्हा नोंद क्र. ४१६/२०२५ मध्ये वेळापूर पोलीस स्टेशन, ता. माळशिरस यांनी जप्त केलेली हिरो कंपनीची एच.एफ. डिलक्स मोटर सायकल गाडी जिचा नोंदणी क्र. एम.एच. ४५, एसी. ७८९६, चेसीस क्र. MBLHAR203H9G01530, इंजिन क्र. HA11ENH9G21479 ही अर्जदाराच्या ताब्यात, खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून देण्यात यावे.

अ. अर्जदाराने वरील नमूद वाहनाची कोणत्याही प्रकारे ओळख अथवा मॉडेल मध्ये बदल करु नये.

ब. अर्जदाराने न्यायालयाच्या परवानगी शिवाय सदरचे वाहन कोणासही विक्री, बक्षीस अथवा गहाण करु नये किंवा त्यावर कोणताही त्रयस्थ बोजा निर्माण करु नये. तसेच, सदरच्या वाहनाचा कोणत्याही गुन्हयात वापर करु नये. ज्या–ज्या वेळी न्यायालय आदेश करील, त्या–त्या वेळी अर्जदाराने सदरचे वाहन गुन्ह्याच्या संबंधाने खटला चालू काळात हजर करावे.

०३. तपासीक अधिकारी यांना निर्देश देण्यात येतो की, सदरचे वाहन अर्जदाराच्या ताब्यात देतेवेळी त्यांनी सदर वाहनाचे छायाचित्र घेवुन सविस्तर पंचनामा तयार

करावा.

**०४.** तपासीक अधिकारी यांना आणखी असाही निर्देश देण्यात येतो की, त्यांनी दोषारोपपत्र दाखल करतेवेळी त्यासोबत सुपुर्तनामा, वाहनाचा पंचनामा व छायाचित्र दाखल करावेत.

**०५.** येणे प्रमाणे संबंधितांना कळविण्यात यावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by GAIKWAD MOHINI JANU
Date: 2026.04.04 17:13:46 +0530

दिनांकः ०४/०४/२०२६ (एम. जे. गायकवाड)
ठिकाणः माळशिरस न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,
माळशिरस (न्या. क्र. ०४)

**C E R T I F I C A T E**

I affirm that, the contents of this PDF file order are same word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| **Name of the Court** | **:** | 4th Jt. C.J.J.D & J.M.F.C., Malshiras. |
| **Name of Stenographer** | **:** | Praveen Nagnath Nalla |
| **Order signed by the Presiding Officer on** | **:** | 04 / 04 / 2026. |
| **Order uploaded on** | **:** | 04 / 04 / 2026. |